# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनाट क्रमांक २३९-२२** **दिनांक ०५/८/२०२२**

## पोलीस आयुक्तांच्या फोटोचा गैरवापर करणा-यांपासुन सावधान.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते यांचे पोलीस गणवेशातील फोटोचा गैरवापर करुन कोणीतरी अज्ञात इसम मोबाईल क्रमांक **7080669933** या व्हॉट्सअॅप क्रमांकावरुन चॅटींग करुन गिफ्ट व्हाऊचर खरेदी करणेबाबतचे संदेश प्रसारित करीत आहे. तरी नागरिकांना आवाहन करण्यात येत की, अशा प्रकारे गिफ्ट व्हाऊचर अथवा इतर काही कारण सांगून पैशाची मागणी करित असल्याचे व्हॉट्सअॅप मेसेजेस / एसएमएस **7080669933** हया क्रमांकावरुन किंवा इतर कोणत्याही क्रमांकावरुन प्राप्त झाल्यास त्यास कोणत्याही प्रकारे प्रतिसाद देवू नये.

उपरोक्त मोबाईल क्रमांक किंवा इतर माध्यमांद्वारे कोणताही अनोळखी इसम नागरिकांशी संपर्क साधत असल्यास तात्काळ नजिकचे पोलीस ठाणे, सायबर गुन्हे शाखा किंवा **www.cybercrime.gov.in** या मेल आयडीवर तक्रार करुन संपर्क साधावा याबाबत मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने आवाहन करण्यात येत आहे.

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचा अधिकृत मोबाईल क्रमांक मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे **www.mbvv.mahapolice.gov.in/** या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

-----oooo----